महाराष्ट्र आदिवासी विकास सेवा गट- ब मधील संशोधन अधिकारी / सहायक प्रकल्प अधिकारी / गृहप्रमुख व तत्सम संवर्गातील पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीबाबत ..

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बढती-१७१८/प्र.क्र.२७६/का.१५

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
तारीख: १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/ का.१२, दि.२८/०४/२०१५.

२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/ का.१२, दि.१६/०७/२०१५.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र आदिवासी विकास सेवेतील गृहपाल/कार्यालय अधिक्षक व तत्सम वेतनश्रेणी (S-१४: ३८६००-१२२८००) गट-क या संवर्गातून सहायक प्रकल्प अधिकारी / संशोधन अधिकारी/गृहप्रमुख व तत्सम या गट-ब (वेतन संरचना रुपये S-१५: ४१८००-१३२३००) या संवर्गात सन २०१८-१९ च्या निवडसूचीनुसार या आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती देण्यात येत आहे.

२. तद्नुषंगाने शासन अधिसूचना, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/ का.१२, दि.२८/०४/२०१५ आणि शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५ /प्र.क्र.१५६/का.१२, दि.१६/०७/२०१५ नुसार पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहित केलेल्या महसूली विभाग वाटप नियम, २०१५ मधील तरतुदींच्या अधिन राहून खालील तक्त्यातील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी तात्पुरत्या पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे-

अ . .क्र	अधिकाऱ्यांचे नाव	तात्पुरत्या पदोन्नतीने पदस्थापनेचे पद
१	२	३
१	श्री.एन.एम. कोपुलवार	संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त.समिती, ठाणे
२	श्री.व्ही.आर. गायकवाड	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्रकल्प, शहापुर
३	श्री.ए.जी. सुर्यवंशी	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प, देवरी
४	श्री.ए.एल. गायकवाड	संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त. समिती, नाशिक
५	कु.एस.बी. वटी	सहायक प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त, नागपूर
६	श्री.एस.व्ही. दौंडकर	संशोधन अधिकारी, आयुक्त, आ .प्र.सं.संस्था, पुणे
७	कु.एस.बी. धैसास	सहायक प्रकल्प अधिकारी, एप्रकल्प .वि.आ., घोडेगांव
८	श्री.एन.डी. जानगर	सहायक प्रकल्प अधिकारी, एप्रकल्प .वि.आ., तळोदा
९	श्रीमती एन.बी. नहिरे	प्रबंधक, असमिती .त.प्र.ज., नाशिक

१०	श्री.एस.एन. काकडे	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प, नंदुरबार
११	श्री.आर.एस. अहिर	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प, पुसद
१२	श्री.आर.एस. भडके	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प, औरंगाबाद
१३	श्रीमती डी.आर. बोराळकर	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प, पांढरकवडा
१४	श्रीमती एस.एस. कुलकर्णी	संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त. समिती नाशिक
१५	श्री.एन.बी. झंपलवाड	सहायक प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प, यावल
१६	श्रीमती सरोजिनी क्षिरसागर	प्रशासकीय अधिकारी, आ.सं.व प्र.संस्था, पुणे
१७	श्रीमती आर.एन. गिरडकर	संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त. समिती, अमरावती
१८	श्री.डी.एम. नागपुरे	संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त. समिती, गडचिरोली
१९	श्री.एस.पी. पानबुडे	संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त. समिती, नागपूर
२०	श्रीमती सुनिता दि. पुसतकर	प्रबंधक, अ.ज.प्र.त. समिती, नंदुरबार

३. वरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तात्पुरती पदोन्नती ही खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१) पदोन्नती व सरळसेवा कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब यांनी दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील व पदोन्नतीसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

३) तात्पुरत्या निवडसूचीतील व पदोन्नतीसूचीतील सर्व अधिकाऱ्यांनी दि.२५.०१.१९९९ अन्वये विहित केलेले महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ व दि.२८.०५.२०१८ विहित केलेले (सुधारणा) नियम, २०१८ नुसार संगणक परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

४) पदोन्नतीच्या कोट्यातील पदावर देण्यात येत असलेली सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असून, ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

५) सदर पदोन्नती शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०८७/२००/प्र.क्र.३/८७/१२, दि.०८/१०/१९९० मधील तरतुदीच्या अधिन राहील.

६) सदर तदर्थ पदोन्नती ही जे अधिकारी ज्येष्ठ आहेत, परंतु ज्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आलेली आहेत, अशा अधिकाऱ्यांच्या ज्येष्ठतेस बाधा न आणता देण्यात येत आहे.

४. तात्पुरत्या पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून सात दिवसाच्या आत हजर होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना नियुक्ती नको असे समजून, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२,दि.१२/०९/२०१६ मधील तरतुदींनुसार त्यांच्या केलेल्या निवडीने नियुक्त्या रद्द करण्यात येतील.

५. तात्पुरत्या पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना नविन पदावर रुजू होण्यासाठी कार्यालय प्रमुख / विभागप्रमुखांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे आणि नविन नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर होण्याबाबत संबंधिताना सूचना दयाव्यात. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अहवाल आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

६. तात्पुरत्या पदोन्नतीने नियुक्ती दिलेल्या पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. त्यांनी अनधिकृतरित्या रजेवर जाऊ नये. यासंदर्भात त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. सीडीआर-१०८२/२५६७/२८/११, दि.३०/०८/१९८२ अन्वये दिलेल्या सूचनांकडे वेधण्यात येत आहे. तसेच नियुक्ती रद्द करणेसाठी कुठल्याही स्वरुपाचे आवेदन करु नये. तसे केल्यास सदर कर्मचारी शिस्तभंगाच्या कारवाई पात्र ठरतील यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१७५१५७१३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GOVIND MAHADEO MAINKAR

Digitally signed by GOVIND MAHADEO MAINKAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=93cbea44cdf3d68abe120a0a967fe5ac93d28b63146be4c3c432f21653b6f6ba, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=301866cb28a109fa37f9b2b3be066426406ccfe599d4017f33195279f8ae8c13, ou=NA, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=GOVIND MAHADEO MAINKAR
Date: 2019.09.18 17:58:55 +05'30'

(गोविंद माईणकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
७. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर

८. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक/ अमरावती / नागपूर
९. सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
११. सर्व अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
१२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१४. संबंधित अधिकारी,
१५. निवड नस्ती (का.१५)